# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०६/२०२५ (सोमवार)**

---

## खुन करणाऱ्या आरोपीला अटक

पोलीस स्टेशन नरखेड :— **पोलीस स्टेशन नरखेड** येथे फिर्यादी नामे योगेश भजनलाल बारंगे, वय ३४ वर्ष, धंदा—शेती,रा.पिपळा, केवळराम फिर्याद दिली की, मौजा उमरी शेत शिवारात येथे दिनांक ०५/०७/२०२५ चे रात्री ०९/०० वा. ते ०९:३० वाजेच्या दरम्यान यातील आरोपी नामे गंगाधर मंगलु मडावी ,वय अंदाजे ६५ वर्षे, रा. आग्रा, ता. नरखेड याने मृतक नामे सुखदेव काशीराम वरखडे, वय ५५ वर्षे, रा.पिपळा ता. नरखेड याला रागाच्या भरात लोखंडी रॉड , कु—हाड, व लोखंडी पंज्याने मृतक यांस जिवानिशी ठार मारले. हकीकत याप्रमाणे आहे की, यातील आरोपी व मृतक हे फिर्यादी यांनी बटईने केलेल्या शेतात मजुरीने काम करून शेतातील घरात रहात होते. आरोपी यांस मृतक हा नेहमी शेतातील कामाबाबत शिवीगाळ करीत होता. घटने दिवशी यातील मृतक हा शेतातील घरातील खाटेवर लोटुन आरोपी याला शिवीगाळ करीत असता आरोपी याला मृतक याचा राग आल्याने रागाच्या भरात तेथीलच लोखंडी रॉड , कु—हाड, व लोखंडी पंज्याने मृतकास जिवानिशी ठार केले.

**सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोस्टे नरखेड येथे आरोपीविरूद्ध कलम १०३(१) भा.न्या.सं २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केले असुन दिनांक ०९/०७/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे.**

# पोलीस स्टेशन खापा अप क्रमांक ३६०/२५ कलम १३७ (१) भान्यासं बाबत..

**पोलीस स्टेशन खापा** :— पोलीस स्टेशन खापा येथे फिर्यादी नामे प्रविण लालचंद वरखेडे, वय ३४ वर्षे, रा. आग्रापुर, पोस्ट घोराड ता. बिचबा, जि. छिंदवाडा, राज्य मध्यप्रदेश ह.मु. निमतलाई वार्ड क्रं ३ ता. सावनेर, जि. नागपुर यांनी रिपोर्ट दिली की, दिनांक ०६/०७/२०२५ रोजी सकाळी ०८:०० वा फिर्यादी आणि त्याची पत्नी दोघेही मजुरीच्या कामाला जात असतांना फिर्यादीचा मुलगा नामे अश्विन प्रविण वरखेडे, वय ६ वर्षे हा घरासमोरील अंगणात खेळत होता. फिर्यादी आणि त्यांची पत्नी दुपारी ०३:०० वाजता कामावरून परत आले. परंतु त्यांना मुलगा अश्विन घरी मिळुन आला नाही. त्यामुळे त्यांनी त्याचा शोध घेतला परंतु मुलगा अश्विन कोठेही मिळुन आला नाही म्हणुन त्यांनी कोणीतरी अज्ञात इसमाने अश्विनला फुस लावुन फिर्यादीच्या कायदेशिर रखवालीतुन अपहरण करून पळवुन नेले बाबत पोलीस स्टेशनला जावुन रिपोर्ट दिली. फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन खापा येथे तात्काळ कलम १३७ (१) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. खापा पोलीसांनी तात्काळ सदर अपहृत अल्पवयीन मुलाचा शोध घेतला परंतु नमुद मुलगा मिळुन आला नाही तरी खालील वर्णनाचा आणि फोटो प्रमाणे मुलगा मिळुन आल्यास किंवा त्या बाबत काहीही माहीती उपलब्ध असल्यास खापा पोलीस स्टेशन येथे तात्काळ माहीती दयावी.

**अपहृत अल्पवयीन मुलाचे वर्णन** :— वय ६ वर्षे, उंची— अंदाजे ३ फुट ४ इंच, रंग — सावळा, चेहरा — गोल, डोक्याचे केस — काळे आणि बारीक , बांधा — सडपातळ, अंगात — गुलाबी रंगाची फुल बाह्याची टी — शर्ट आणि कथ्थ्या रंगाचा हाफ पॅन्ट घातलेला.

**संपर्क क्रमांक :— १. पोलीस स्टेशन खापा**

**07113-286122**

**२. सपोनि किशोर भुजाडे, प्रभारी अधिकारी, पोस्टे खापा.**

**8378990801**

**३. पोउपनि जगदिश पालीपाल, तपासी अधिकारी**

**9921337288**


2025/7/6 20:08

# अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू, विदेशी दारू बाळगणाऱ्या/विक्री/वाहतुक करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, १७ गुन्हे नोंद एकुण ७४,४१२/—रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक ०६/०७/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री आणि वाहतुक करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू, विदेशी दारू आणि गुन्हयात वापरण्यात आलेले वाहन असा एकुण ७४,४१२/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे** आरोपी क्रं १) विशाल पिलाजी माकोड, वय ४७ वर्ष, रा. वार्ड क्र. ०९, न्यू खाटीक मोहल्ला, कळमेश्वर आणि आरोपी क्रं २) संजय मारोतराव महाजन, वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र. १६, कळमेश्वर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन केळवद येथे** आरोपी क्रं १) मनोज गुप्ता , ५५ वर्ष, रा उमरी, ता. सावनेर, जि. नागपुर याचेवर **गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन मौदा** येथे रूपेश सुखदेव वैदय,वय ३२ वर्ष, रा. सावरी, ता. जि. भंडारा याचे गुन्हा नोंद आहे**, पोलीस स्टेशन खापरखेडा** येथे मोहीत विजय मेश्राम, वय २८ वर्ष, रा. अजनी, इंदीरा नगर, नागपुर ह.मु दहेगाव रंगारी बसेर बार, ता. सावनेर याचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी क्रं १ नामे दिपक गोपाल याद, वय ३५ वर्षे, रा.गणेश नगर, कन्हान, ता. पारशिवनी जि.नागपुर, आरोपी क्रं २ धरमदास आसाराम रामटेक, वय ५५ वर्ष, रा. न्यु गाडेगाव, कन्हान, ता. पारशिवनी, जि.नागपुर, आरोपी क्रं ३ रामेश्वर रामसिंग ठाकुर,रा. टेकाडी आणि आरोपी क्रं ४ साहाबसिंग टिकाराम ठाकुर, वय ६१ वर्ष, रा. टेकाडी, कन्हान, ता. पारशिवनी जि.नागपुर यांचेवर **गुन्हा नोंद आहे, पोलीस स्टेशन कोंढाळी येथे** आरोपी नामे १. जयपालसिंग कुंजनसिंग चंदेल, वय ५४ वर्ष, रा. शनिचरापेठ कोंढाळी आणि आरोपी क्रं ,२. राजकुमार जगलालजी जयस्वाल, वय ५० वर्ष, रा. चाकडोह ता काटोल, जि नागपुर, यांच्यावर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे चेतन संजय रेवतकर, वय ३१ वर्षे, रा. वार्ड क्र ०८ सावरगाव, ता नरखेड याच्यावर गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) विजय नारायण सर्याम, वय २१ वर्ष आणि २) शरद भाउराव उईके, वय ३९ वर्ष दोन्ही रा. येरंडा याच्यावर गुन्हा नोंद

आहे. **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे राजेश फत्तु देव्हारे, वय ४५ वर्ष ,रा. गोठणगाव, ता. कुही, याच्यावर गुन्हा नोंद आहे **पोलीस स्टेशन एम आय डी सी बोरी** येथे आरोपी क्रं १ अंशुल प्रोपेश्वर ढोले, वय २१ वर्षे, रा एकता नगर, भारकस, ता. हिंगणा आणि आरोपी क्रं २ मुकेश कंचन मडाव वय ३० वर्षे, रा. टेंभरी, ता. हिंगणा याच्यावर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन अरोली** येथे निकेश नरेश कटांगले, वय ३१ वर्ष रा. मान्द्री, ता.रामटेक ह.मु. खात ता.मौदा, जि.नागपुर याच्यावर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे महीला आरोपीवर गुन्हा नोंद आहे अशा **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १७ गुन्हे दाखल केले आहे.**

## प्राणांतिक अपघात

पोस्टे कळमेश्वर येथे फिर्यादी शिसुपाल कुमेरसिंग ठाकुर, रा. कत्तरवाडा ता. सिवनी ह.मु. येरला, महिंद्रा घरडे,यांचे घरी किरायाने यांनी रिपोर्ट दिली की मौजा येरला येथे दि. ०५/०७/२०२५ चे संध्याकाळी ०७/०० वा. ते ०७/३०वा वा. दरम्यान फिर्यादीचे वडील यातील मृतक कुमेरसिंग गंभीर ठाकुर, वय ५५ वर्ष रा. येरला हे गावातील चौधरी किराणा दुकाना समोरील कळमेश्वर ते नागपुर कडे जाणारा मुख्य रस्ता ओलांडत असतांना कळमेश्वर वरून नागपुरच्या दिशेने जाणारी रिट्स कंपनीची मरून रंगाची कार क्र. एम.एच ३१ — १२१८ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवून फिर्यादीचे वडीलाला धडक मारली त्यामुळे मृतक गंभीर जखमी होवुन त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कळमेश्वर येथे आरोपी कार चालकाविरूद्ध कलम २८१,१०६,सह कलम १८४,१३४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद आहे.

## काटोल बसस्थानकाला अतिक्रमणाचा वेढा या बातमी बाबत ...

दिनांक ०७/०७/२०२५ रोजी एका वृत्तपत्रात **काटोल बसस्थानकाला अतिक्रमणाचा वेढा** अशा मथळाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. **बसस्थानक काटोल येथे अतिक्रमण असल्याबाबत नगरपालीका यांचेकडुन पोलीस प्रशासनाकडे बंदोबस्ताकामी मागणी करण्यात आली नाही. तसेच कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार करण्यात आला नाही.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने